# नगरपंचायत आष्टी, जि. वर्धा

## ई - निविदा फॉर्म

## (जाणीव जागृती कार्यक्रमा राबविणे)

----------***----------

**सन २०१७-२०१८ करिता आष्टी (शहिद), माहिती व जनशिक्षण अंतर्गत सर्वकष जाणीव जागृती कार्यक्रमा राबविणेबाबत.**

----------***----------

**निविदा प्रपत्र किंमत रूपये २५००/-**

# कार्यालय नगरपंचायत आष्टी (श.)
## ता. आष्टी (श.) जि. वर्धा

**दुरध्वनी क्र. :-** ०७१५६२२५०४२ **email :-** ashtinp79@gmail.com

क्रमांक/ /नपआ/ई.नि.क्र.९/२०१७ दिनांकः- / /२०१७

**** ई-निविदा ****

मुख्याधिकारी नगरपंचायत आष्टी यांचे वतीने नगरपंचायत क्षेत्रातील संपुर्ण स्वच्छता अभियानासाठी माहिती जनशिक्षण अंतर्गत सर्वकष जाणीव जागृती कार्यक्रम राबविणे करिता अनुभवी कंत्राटदार/ संस्थांकडुन ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दिनांक २२/६/२०१७ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाचे विवरण | अनामत रक्कम | कोरे ई-निविदा प्रपत्रची रक्कम | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | "संपुर्ण स्वच्छता अभियानासाठी व जनशिक्षण अंतर्गत सर्वकष व जाणीव जागृती कार्यक्रम राबविने बाबत | १०,०००/- | २५००/- | कार्यादेशा पासुन १ वर्षापर्यंत |

**निविदा पध्दती तपशिल :-**

| | |
|---|---|
| ई निविदा प्रसिध्दी | दिनांक २२/०६/२०१७ सायंकाळी वाजता पासुन |
| ई निविदा दस्ताऐवज डाउनलोड प्रारंभ | दिनांक २२/०६/२०१७ सायंकाळी वाजता पासुन |
| ई निविदा दस्ताऐवज डाउनलोड समाप्त | दिनांक ०३/०७/२०१७ दुपारी ३ वाजे पर्यंत |
| ई निविदा दाखल करण्याची सुरूवात दिनांक | दिनांक २२/०६/२०१७ दुपारी १ वाजे पासुन |
| ई निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | दिनांक ०३/०७/२०१७ दुपारी ५ वाजे पर्यंत |
| ऑनलाईन निविदा उघडणे | दिनांक ०४/०७/२०१७ दुपारी ५ वाजे पासुन |

**अध्यक्षा**
**नगरपंचायत आष्टी (श.)**

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत आष्टी (श.)**

आष्टी नगरपंचायत, जिल्हा वर्धा

" संपूर्ण स्वच्छता अभियानासाठी "

माहिती व जनशिक्षण अंतर्गत सर्वंकष जाणीव जागृती कार्यक्रम राबविणेबाबत

**प्रस्तावना:**

आज आपल्याला भेडसावणाऱ्या समस्यांपैकी एक महत्त्वाची समस्या म्हणजे स्वच्छतेची व कचऱ्याची समस्या. जगातील प्रत्येक देशाला, राज्याला, शहराला व गावांना आणि पर्यायाने संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेला या प्रश्नाची भयानकता कमी जास्त प्रमाणात भेडसावत आहे. बदलत्या जीवनशैली मुळे हा प्रश्न शहर आणि ग्रामीण भागात सार्वत्रिक झाला आहे. प्लास्टिक वापराचे प्रमाण वाढले आहे. कुठेही, कधीही, कसाही पडणारा कचरा पर्यावरणाचे तीन महत्वाचे घटक प्रदूषित करतो - हवा जमीन आणि पाणी. अशा वेळी संपूर्ण स्वच्छतेसाठी कचऱ्याचे अतिशय काटेकोरपणे संकलन व नियोजन करून त्याची विल्हेवाट लावणे गरजेचे झाले आहे.

जी आपल्याला नको ती टाकून देण्याची गोष्ट म्हणजे कचरा हे सर्वमान्य आहे. लवकरात लवकर त्यापासून सुटका मिळवणे या माणसाच्या मुलभूत सवयीतून आज त्याने उग्र रूप घेतले आहे. आपण आणि आपले घर स्वच्छ असावे असे सर्वाना वाटते. पण ही भावना सार्वजनिक क्षेत्रात मात्र अभावानेच दिसते. घराच्या आजूबाजूचा परिसर, गल्ल्या, रस्ते, सार्वजनिक ठिकाणे जसे की बागा, बस स्टॉप, कार्यालये इ. ठिकाणी कचरा पसरलेला दिसतो. शहरात भरून वाहणाऱ्या कचराकुंड्या, त्यावर वावरणारी कुत्री, डुकरे, इतर प्राणी-पक्षी कचरा विस्कटून परिसर आणखी अस्वच्छ करतात. उकिरडे, नाल्या-गटारी, पाण्याचे साठे, नद्या, ओढे, प्लास्टिकच्या कचऱ्याने वेढलेले आपण बघतो. आजूबाजूच्या निसर्ग सौंदर्याला त्यामुळे बाधा येते. आपली पर्यटन स्थळे, तीर्थक्षेत्र, सर्वांनाच या कचऱ्याने विद्रूप केले आहे.

शासकीय यंत्रणा आपल्या परीने स्वच्छता ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करते, त्यावर पैसाही मोठ्या प्रमाणावर खर्च करते. पण कचरा करणारे हात जास्त आणि स्वच्छता करणारे हात कमी अशी विषम परिस्थिती असल्याने अस्वच्छता वाढतेच आहे. हे सर्व बदलावे असे ज्यांना मनापासून वाटते त्या सर्वांनी एकत्र येऊन एका दिशेने नेटाने प्रयत्न केल्याशिवाय कचऱ्याचा विळखा सुटणार नाही. त्यासाठी प्रथम आपल्याला आपला जुना दृष्टीकोन बदलायला हवा. कचरा तयार करणाऱ्या प्रत्येकाने कचरा व्यवस्थापन ही आपलीही जबाबदारी आहे, हा नवा विचार, नवा दृष्टीकोन आपल्याला स्वीकारायला हवा. नागरिकांच्या कृतीशील सहभागामुळेच स्वच्छतेचा प्रश्न योग्य प्रकारे सुटू शकतो. यासाठी उत्तम, संवाद कौशल्ये व साधनांचा वापर करून माहिती व जन शिक्षण अभियाना बरोबर कचरा व्यवस्थापना साठी सर्वंकष विचार करून प्रत्यक्ष कृती करण्याची गरज आहे.

**प्रकल्पाचा कालावधी:**

प्रकल्पाचा कालावधी १ वर्षाचा असेल...

**कामाचे स्वरूप व व्याप्ती:**

भाग १: संपूर्ण सर्वेक्षण व जाणीव जागृती आराखडा तयार करणे..

शहरातील प्रत्येक घराचे सर्वेक्षण करणे. घनकचरा विषयाची व्याप्ती सुयोग्यपणे समजून घेणे व त्या सर्वेक्षणातून खालील बाबीचा व्यवहार्य नियोजन आराखडा तयार करणे.

a. आष्टी नगरपंचायत क्षेत्रात संपूर्ण स्वच्छतेसाठी माहिती व जनशिक्षणाचा नियोजनबद्ध आराखडा तयार करणे. उपलब्ध साधनसामुग्री, कामगार त्यांचे प्रशिक्षण तसेच सक्षमीकरणासाठी उपाययोजना सुचविणे तसेच त्यांचा सविस्तर कृतिकार्यक्रम आखणे.

b. शहरातील कचरा समस्येचा सर्वंकष अभ्यास करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना योजण्याच्या दृष्टीकोनातून अहवाल तयार करणे. ओला व सुका कचरा वर्गीकरणासाठी योजना, कचरा संकलनाचा सविस्तर आराखडा व कचरा प्रक्रियेसंबंधी विविध पर्यायांची मांडणी याचा सविस्तर अहवाल तयार करणे.

भाग २: संपूर्ण स्वच्छतेबाबत व कचरा वर्गीकरणाबाबत जनजागरण मोहीम राबविणे...

- संपूर्ण स्वच्छतेबाबत व कचरा वर्गीकरणाबाबत विविध गटांचे प्रशिक्षण करणे.
    - आष्टी नगरपंचायत कचरा व्यवस्थापनाशी संबधित कर्मचारी वर्ग.
    - आष्टी शहरातील सक्रीय महिला मंडळे व बचत गट
    - शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी
    - हॉटेल व उपाहारगृहाचे मालक व चालक
    - आर्वी परिसरातील भाजीपाला घाऊक व किरकोळ विक्रेते
    - विविध परिसरातील दुकानदार

- आष्टी शहर क्षेत्रात संपूर्ण स्वच्छतेसाठी नियोजनबद्ध आराखडानुसार वेगवेगळे जाणीव जागृती कार्यक्रम राबविणे.
- आष्टी शहर क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्यासंबंधी संकलन, वाहतुक, सुक्या कचऱ्याचे पुनर्वापर व ओल्या कचऱ्यावर शास्त्रीय प्रक्रीया यासंबंधी नगरपालिकेला मार्गदर्शन करणे.
- आष्टी शहर क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे निर्मिती स्तरावर ओला व सुका असे वर्गीकरण करण्यास नागरीकांना जागृत करणे.
- आष्टी नगरपंचायत क्षेत्रात निर्माण होणाऱ्या कचऱ्यासंबंधी योग्य अभ्यास करुन कचऱ्याचे मुळ स्त्रोताकडेच जास्तीत जास्त संकलन होईल यासाठी नगरपालिकेला मदत करणे.
- कचऱ्याची वाहतुक व्यवस्था सुधारण्यासाठी व कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त कचरा संकलित व्हावा यासाठी नगरपालिकेला तसेच वाहतुक कंत्राटदाराला मदत करणे.

- पुनर्वापरासाठी योग्य कचरा मिश्र स्वरूपात येऊ नये यासाठी जनजागरण राबविणे. कचऱ्याची समस्या त्यावरील उपाय व पुनर्वापरासाठी योग्य कचऱ्याचे मूल्य यासंबंधी जाणीव जागृती करणे.
- सुक्या कचऱ्याचे जास्तीत जास्त पुनर्वापरातून मूल्यवर्धन करण्याचे प्रकल्प राबविण्यास नगरपंचायतला मदत करणे.
- नगरपंचायत क्षेत्रात निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यावर शात्रीय पद्धतीने प्रक्रीया व्यवस्था उभारण्यास नगरपालिकेला मार्गदर्शन करणे.
- पुनर्वापरास अयोग्य अशा कचऱ्याची कचरा डेपो येथे विल्हेवाट लावली जाते. हा कचरा कमी करण्याचा प्रयत्न करणे. जेणेकरून कचरा डेपो येथील भू-भरण / प्रक्रिया केंद्रात कमीत कमी कचरा पाठविला जाऊन कचरा डेपोची जागा जास्तीत जास्त दिवस वापरली जाऊ शकेल.
- नगरपंचायत क्षेत्रातील कचरापेट्यांची संख्या कमी व्हावी या पद्दतीने संकलन व्यवस्था निर्माण करण्यासाठी नगरपालिकेला मार्गदर्शन करणे.

भाग ३ : माहिती व जनशिक्षणाचे कामासाठी सर्जनशील साहित्याची, पोस्टर, बॅनर, standy, स्टिकर, ऑडीओ क्लिप, इत्यादिं साठी मजकूर व डिझाईन तयार करणे...

- ✓ सर्वेक्षणा दरम्यान संपूर्ण स्वच्छता ह्या विषयासंबंधीत अगोदर राबविण्यात आलेल्या जाणीव जागृती कार्यक्रमांच्या परिणामांचा अभ्यास करणे व संबंधीत विषय परिणामकारक रीत्या नागरिकांपर्यंत पोचविण्यासाठी कल्पक / योग्य संवाद कौशल्यांचा वापर करणे.
- ✓ परिणामकारक जनशिक्षणासाठी आवश्यक साधनांची गरज समजून घेणे व त्यानुसार सर्व सामान्य नागरिकांपर्यंत स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी सर्जनशील साधनांची निर्मिती करणे.
- ✓ सदर विषय विद्यार्थी तसेच सर्व नागरिकांपर्यंत पोचावा यासाठी कार्टून फिल्म दाखवणे. फिरते प्रदर्शनासाठी आवश्यक चित्र, फोटो, माहिती नकाशे तयार करणे.
- ✓ नागरिकांचे म्हणणे नगरपालिकेमध्ये योग्य रीत्या पोचावे व त्यावर उपाययोजना करता यावी यासाठी सोपे संवादाचे माध्यम उभारणे. नागरीकांना स्वच्छता अभियानात सक्रीय सहभाग घेतां यावा यासाठी अत्याधुनिक संवाद साधनांचा मदतीने उदा. मोबाईल, संगणक याद्वारे माहितीची देवाण-घेवाण सुरळीत व्हावी अशी व्यवस्था उभारणे.

# नगरपंचायत आष्टी, जिल्हा वर्धा

## निविदा अटी व शर्ती

निविदा पत्रे / फॉर्म:

अ) विहित नमुन्यातील निविदा फॉर्मची विक्री नगरपंचायत कार्यालय नगरपंचायत आष्टी येथे दि.  /  /२०१६ पर्यंत कामाचे दिवशी सकाळी ११.०० वा. पासून ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत

निवडीच्या गुणतक्त्याचे निकष:

अर्जदार संस्था खालील निकष पूर्ण करीत असली पाहिजे.

1. अर्जदार संस्था मुंबई विश्वस्त संस्था अधिनियम १९५० अथवा कंपनी कायदा १९५६ (कलम २५) अथवा नवीन कंपनी कायदा कलम ८ अथवा सहकार कायद्या अंतर्गत नोंदणीकृत अथवा मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ (महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम, १९६१ च्या नियम ६ अन्वये) कातड्या अंतर्गत नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.
2. सदर संस्था पर्यावरण विषयात काम करणारी असावी व त्या संस्थेने किमान दोन शासकीय / निमशासकीय यंत्रणेनेसाठी जन जागृतीसाठी कल्पक साधने उदा. फिल्म बनविण्याचे काम केलेले असावे.
3. कमीत कमी ३० हजार लोकसंख्या असलेल्या आणि किमान १० ते १२ टन कचरा व्यवस्थापनाचा, जनजागरण प्रकल्प राबविण्याचा कोणत्याही नगरपालिकेचा अनुभव असणाऱ्या खाजगी / सहकारी / सामाजिक इच्छुक संस्था प्रस्ताव सादर करू शकतील.
4. सर्जदार संस्थांची मागील ३ वर्षाची वार्षिक उलाढाल किमान रु. २५,००,०००/- असाली पाहिजे. तसे लेखापरीक्षणाचे अहवाल संस्थेने सादर करणे आवश्यक आहे.
5. संपूर्ण प्रस्तावाची माहिती, कागदपत्रे नगरपंचायतीच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येतील.
6. प्रस्तावासोबत
    - i. संस्था नोंदणी प्रमाणपत्र
    - ii. मागील ३ वर्षाचा लेखा परीक्षण अहवाल
    - iii. पॅन कार्ड
    - iv. संस्थेची घटना व कार्यकारी मंडळ माहिती पत्र.
    - v. स्वच्छता व कचरा व्यवस्थापनासंबंधी जनशिक्षणाच्या कामाच्या अनुभवा बाबतचे किमान ४ पानांमध्ये सविस्तर माहिती, यामध्ये कामाचे ठिकाण, प्रकल्पाचे नाव, कालावधी, प्रकल्पाची किंमत, याकामी उपलब्ध केलेले मनुष्यबळ, वापरण्यात आलेली कार्य पद्धती व प्रकल्पाचे मुख्य व्यक्तीचा बायोडाटा (त्याच्या अनुभवाची सविस्तर माहिती) इ. कागदपत्र PDF करून ONLINE सादर करावीत.
    - vi. मागील केलेल्या कामाची प्रशस्तीपत्र

**परिशिष्ट - अ**

**प्रतिज्ञा पत्र**

*नोट- सदरचे* ***प्रतिज्ञा पत्र*** *हे रु. 100/- च्या स्टँप पेपरवर करून निविदा सोबत जोडावे*

मी ----------------------------------------------------------------- वय --- वर्षे राहणार ------------------

-------------------------------------- या सत्यप्रतीज्ञा लेखादवारे लिहून देतो की मी ------------------

---------------------------------------------------- या कंपनी चा प्रोपरायाटर / भागीदार असून मी ------

------------------------------------------------------------------------------------------- या कामासाठी

ई — निविदा सदर केली आहे. सदर निविदेसोबत जी कागदपत्रे सादर केली आहेत सदर कागदपत्रे सत्य, बरोबर व परिपूर्ण आहेत सदर कागदपत्रामध्ये त्रुटी आठवा चुका नाहीत असे शपथपूर्वक मान्य करत आहे. या कागदपत्रामध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व अपूर्ण माहिती आढळल्यास मी कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

निविदाधारकाचे नाव ----------------------------------------------------

पत्ता - --------------------------------------------------------

दिनांक- निविदाधारकाची सही

साक्षीदाराचे नाव- ------------------------------------------------------

पत्ता - --------------------------------------------------------

दिनांक-- साक्षीदाराची सही

## परिशिष्ट - ब
## प्रतिज्ञा पत्र

*नोट- सदरचे* ***प्रतिज्ञा पत्र*** *हे रु. 100/- च्या स्टँप पेपरवर करून निविदा सोबत जोडावे*

मी/आम्ही याद्वारे असे नमूद करतो की, महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १६(१)(आय) व कलम ४४(१)(ब) ज्या तरतुदी उदधत केलेल्या आहेत त्याबाबत माहिती आहे आणि गंभीरपणे नमूद करतो की, नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधीन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविधेमध्ये नगरपंचायतीच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा, हितसंबंध किंवा आमच्यात भागीदारी नाही.

कलम १६(१)(आय) - यापुढे तरतूद केली असेल त्या व्यतिरीक्त नगरपालिकेच्या आदेशावरून केलेक्या कोणत्याही कामात किंवा नगरपालिकेशी किंवा नगरपालिकेच्या अधीन किंवा नगरपालिकेने किंवा नगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविधेमध्ये जिचा स्वताचा किंवा आपल्या भागीदारी मार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.

कलम ४४(१)(ब) - पालिका सदस्य म्हणून नगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणून ज्या कोणत्याही बाबतीत कलम १६ चे पोटकलम (३), खंड (अ), (ब), (क), (इ) व (ग) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्याच्या भागीदाराचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अशा हिस्साची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो किंवा जीत त्याच्या अशीलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायीक दृष्ट्या त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.

निविदाधारकाचे नाव --------------------------------------------------
पत्ता - -------------------------------------------------------

दिनांक- निविदाधारकाची सही

साक्षीदाराचे नाव- ----------------------------------------------------
पत्ता - -------------------------------------------------------

दिनांक-- साक्षीदाराची सही

Signature Not Verified

Digitally signed by GOSAVI PANKAJ VISHNU
Date: 2017.06.22 13:18:22 IST
Location: Maharashtra